महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी
योजना व संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रम
एकत्रितपणे राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:संकीर्ण २०१२/प्र.क्र.५७/पापु-१६
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक - २९ फेब्रुवारी, २०१२.

पहा: १) नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र. मजुरी-२०११/प्र.१५/मग्रारो-१ ,दि. १९ मार्च २०११.

२) ग्रामविकास मत्रालय, केंद्रशासन अधिसुचना क्रमांक S.O.२२६५(E)& S.O. २२६६(E), दिनांक ३० सप्टेंबर २०११

३) केंद्रीय ग्राम विकास मंत्रालय यांनी संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या जूलै, २०११ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने दिनांक ३० सप्टेंबर,२०११ च्या अधिसूचनेनुसार महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, अनुसूची १, परिच्छेद १(IX) अंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांमध्ये स्वच्छता सुविधांचा समावेश केला आहे. या अनुषंगाने ग्राम विकास मंत्रालयाने www.nregs.nic.in या वेबसाईटवर मार्गदर्शन सूचना दर्शविलेल्या आहेत. त्यानुसार संपुर्ण स्वच्छता अभियानांअंतर्गत बांधण्यात येत असलेल्या वैयक्तिक शौचालय, अंगणवाडी, शालेय व सार्वजनिक स्वच्छतागृहाच्या बांधकामातील अकुशल व कुशल मजूरींचा मर्यादित खर्च महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**<u>शासन निर्णय</u>**

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार संमूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रमा अंतर्गत बांधण्यात येत असलेल्या वैयक्तिक शौचालय, अंगणवाडी, शालेय व सार्वजनिक स्वच्छतागृहाच्या बांधकामातील अकुशल व कुशल मजूरीच्या मर्यादित खर्च महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर स्वच्छता सुविधांची कामे जिल्ह्याच्या संपूर्ण स्वच्छता अभियानाच्या मंजूर प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये समाविष्ठ असणे आवश्यक आहे. मात्र ही अट इंदिरा आवास योजनेंतर्गत संपूर्ण स्वच्छता अभियानातून बांधावयाच्या वैयक्तिक शौचालयास लागू राहणार नाही. इंदिरा आवास योजनेंतील प्रत्येक लाभार्थीला घरासोबत , वैयक्तिक शौचालयासाठी अनुदान व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरी अनुज्ञेय असेल. वरील कामांसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून अकुशल व कुशल मनुष्यबळासाठी करावयाचा मजूरीचा खर्चाबाबतचे विवरण खालील तक्त्यात दिले आहे.

| अ.क्र. | स्वच्छता सुविधा | MGNREGS अंतर्गत मनुष्यबळ मर्यादा | |
|---|---|---|---|
| | | अकुशल | कुशल |
| १ | वैयक्तिक शौचालय (SC,ST किंवा BPL) | ६ | २ |
| २ | अंगणवाडी स्वच्छता गृह | १० | ३ |
| ३ | शालेय स्वच्छता गृह | २५ | ८ |
| ४ | सार्वजनिक स्वच्छता गृह (१० युनिट) | २५० | ८५ |

उपरोक्त मनुष्यबळासाठी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येणारा निधी हा संपूर्ण स्वच्छता अभियानासाठी उपलब्ध करुन देण्यात येणा-या निधीव्यतिरिक्त असेल.

**२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनांतर्गत करण्यात येणाऱ्या बांधकामांसाठी बंधनकारक अटी व शर्ती (बाबी) :-**

१) ग्राम सभेची शिफारस व ठराव असणे आवश्यक आहे.
२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनांतर्गत करावयाच्या कामासाठी जॉबकार्डधारक मजूरांची नेमणूक करण्यात यावी.
३) मजूर उपस्थितीची नोंद ग्रामसेवक / ग्रामरोजगार सेवक यांच्या मार्फतच घेणे आवश्यक आहे.
४) मजूरीचे प्रदान बँक/टपाल कार्यालयाद्वारे करण्यात यावे.
५) या योजनेंतर्गत कंत्राटदार/ठेकेदार यांची नेमणूक अथवा यंत्रसामुग्री यांचा वापर करण्यात येऊ नये.
६) वैयक्तिक शौचालय बांधकामासाठीचे अकुशल काम लाभार्थीने स्वत: करावयाचे असून तो जॉबकार्डधारक असावा.
७) संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत यापूर्वी लाभ घेतलेल्या कुटुंबांना या योजनेत सहभाग घेता येणार नाही.
८) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत केलेल्या अकुशल व कुशल कामाची नोंद MIS वर घेणे बंधनकारक आहे.
९) सदर कामाचे सामाजिक अंकेक्षण अनिर्वाय असल्याने अकुशल व कुशल कामावरील खर्चाची सर्व प्रमाणके / पावत्या सामाजिक अंकेक्षणासाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

**३) स्वच्छता सुविधांचे नियोजन, अंमलबजावणी व सनियंत्रण करण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे कार्यवाही करावी.**

**अ) नियोजन :-**

१) वैयक्तीक शौचालय, अंगणवाडी, शालेय व सार्वजनिक स्वच्छतागृहांचे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत करावयाच्या कामांकरीता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे नियम लागू राहतील.

२) वैयक्तीक शौचालयाचा लाभार्थी हा दारिद्रय रेषेखालील असावा. तसेच तो स्वत: जॉबकार्डधारक असून त्याने स्वत: बांधकामावरील अकुशल भागावर काम करावे.

३) वैयक्तीक शौचालयाच्या जोत्यापर्यंतच्या (Upto Plinth) बांधकामासाठी लागणारे कुशल व अकुशल मनुष्यबळ हे संपूर्णपणे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून उपलब्ध करुन घ्यावे.

४) वैयक्तीक शौचालयाच्यां मागणीकरीता लाभार्थ्याने सोबतच्या प्रपत्रात (प्रपत्र-अ)ग्रामपंचायतीस अर्ज सादर करावा. शालेय स्वच्छतागृहाकरीता मागणीचा प्रस्ताव शाळा व्यवस्थापन समितीने ग्राम पंचायतीकडे सादर करावा. अंगणवाडी स्वच्छतागृह, व सार्वजनिक स्वच्छतागृह बांधकाम करण्याकरिता ग्रामपंचायतीने प्रस्ताव सादर करावा.

५) वैयक्तीक शौचालय, अंगणवाडी, शालेय व सार्वजनिक स्वच्छतागृहांचे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंअंतर्गत करावयाच्या कामांसाठी प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्या प्रस्तावांना ग्राम सभेची मान्यता घेऊन त्यांचा ग्रामपंचायतीच्या आराखड्यात समावेश करावा व सदरच्या कामांचा प्रकल्पशेल्फ तयार करावा.

६) वैयक्तीक शौचालय, अंगणवाडी, शालेय व सार्वजनिक स्वच्छतागृहांचे बांधकामासाठी आराखडे व संकल्पचित्रे संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत प्राधिकृत अभियंत्यानी करावीत.

७) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत करावयाच्या बाबी व संपूर्ण स्वच्छता अभियान अंतर्गत करावयाच्या बाबी यांचे एकत्रीत अंदाजपत्रक(कामनिहाय) करण्यात यावे. यामध्ये दोन्ही कार्यक्रमांच्या बाबी स्वतंत्रपणे दर्शविण्यात याव्यात, . जेणेकरुन कोणत्याही बाबींची पुनरावृत्ती होणार नाही.

८) वैयक्तीक शौचालय, अंगणवाडी, शालेय स्वच्छतागृह व सार्वजनिक स्वच्छतागृह यांच्या बांधकामांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत प्राधिकृत अधिकारी व अभियंते यांनी द्यावी.

९) सदर कार्यक्रम प्रधम एक वर्षासाठी असुन त्यानंतर या कार्यक्रमाचे पुनर्जिवन करण्यात येईल.

ब) अंमलबजावणी

१) संपूर्ण स्वच्छता अभियान व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत झालेल्या कामांचे मुल्यांकन मोजमाप पुस्तकात स्वतंत्रपणे नोंदविण्यात यावे. यासाठी संपूर्ण स्वच्छता अभियान व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना एकत्रिकरण (Convergence) अंतर्गत एकाच मोजमाप पुस्तकाचा वापर करण्यात यावा.

२) दोन्ही योजनांतर्गत झालेल्या कामाचे मोजमाप व पुर्णत्वाचे दाखले संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत प्राधिकृत अभियंता यांनी करावी.

**क) महत्वाच्या बाबी :-**

१) या अंतर्गत करावयाच्या कामांकरीता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मोठ्या प्रमाणात कुशल व अकुशल मनुष्यबळ लावण्यात येणार असल्याने कामाच्या खर्चात बचत होणे अपेक्षित आहे. तरी सदर बचतीतून कामाची गुणवत्ता व दर्जा यात सुधारणा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावरुन योग्य नियोजन करण्यात यावे.

२) याअंतर्गत उपलब्ध करुन द्यावयाच्या स्वच्छता सुविधा या संपूर्ण स्वचछता अभियानांतर्गत मंजूर झालेल्या फक्त नव्याने हाती घ्यावयाच्या कामांसाठीच लागू राहतील. यात सध्या चालू असलेल्या कामांचा समावेश करता येणार नाही. तथापि जिल्हा वार्षिक योजनेच्या

नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत शाळांमध्ये स्वच्छतागृहांच्या बांधकामातील अकुशल व कुशल मजूरीचा मर्यादित खर्च महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनमधून करता येईल.

३) स्वच्छता सुविधांचे बांधकाम करतांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी व संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्यात यावे.

४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत करावयाच्या कामासाठी कुशल मनुष्यबळ लावतांना साहित्य हिस्सा हा या कामातील सदर योजनेंतर्गत झालेल्या खर्चाच्या ४०% पर्यंत मर्यादित राहील याची दक्षता घ्यावी.

**ड). सनियंत्रण व अहवाल :-**

संपूर्ण स्वच्छता अभियान व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामाच्या प्रगतीची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छता सुविधा निहाय करावयाच्या कार्यवाहीचा तपशील सोबतच्या प्रपत्र ब्बछमध्ये दर्शविला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. 201203020938363600१ हा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

व्ही.गिरीराज

**( व्ही.गिरीराज )**
**प्रधान सचिव,**
**(रो.ह.यो.),नियोजन विभाग**

**( मालिनी शंकर )**
**प्रधान सचिव,**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

प्रत :-

मा.राज्यपाल यांचे खाजगी सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
सर्व मा. मंत्री ( पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव.
सर्व मा. राज्यमंत्री ( पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई.
सर्व अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग,मुंबई.
महासंचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई.
सदस्य सचिव;महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई.
संचालक,भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे
विभागीय आयुक्त, सर्व
आयुक्त महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र, नागपूर
जिल्हाधिकारी,सर्व
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
उपायुक्त (विकास), सर्व
उपसचिव तथा प्रकल्प संचालक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष.
उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती पापु-१६

11 >4

# प्रपत्र "अ"

(महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना व संपूर्ण स्वच्छता अभियान यांच्या संयुक्त विद्यमानांतर्गत वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामासाठी अर्जाचा नमुना व वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामांतर्गत अकुशल कामाच्या मागणीबाबत)

| | |
|---|---|
| प्रती,<br>सरपंच,<br>ग्रामपंचायत____________<br>तालूका ____________<br>जिल्हा ____________ | प्रती,<br>कार्यक्रम अधिकारी,<br>तालूका ____________<br>जिल्हा ____________ |

दि. __________ अर्जाचा सांकेतांक ________________ (कार्यालयीन वापरासाठी)

विषय : महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना व संपूर्ण स्वच्छता अभियान यांच्या संयुक्त विद्यमानांतर्गत वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामासाठी अर्जाचा नमुना व वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामांतर्गत अकुशल कामाच्या मागणीबाबत.

महोदय/महोदया,

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना व संपूर्ण स्वच्छता अभियान यांच्या संयुक्त विद्यमानांतर्गत माझ्या निवासस्थानी वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामासाठी मी विनंती अर्ज करु इच्छितो/इच्छिते. याबाबतचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

५) माझ्या निवासस्थानी वैयक्तिक शौचालयाची मजूंर झाल्यास त्याचा मी व माझे कुंटुंब नियमित वापर करुन शौचालयाची योग्य रितीने स्वच्छता व निगा घेऊ.

६) मी दारिद्र रेषेखालील व्यक्ती /अनुसुचित जाती/अनुसुचित जमाती या प्रवर्गातील आहे.

७) मी राहत असलेल्या घराच्या जागेचा खासरा/भूखंक क्र.________ हा आहे.

अर्जदाराची सही/डाव्या हाताच्या अंगठ्याचा ठसा

.हात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत स्वच्छता सु... ..निहाय करावयाची कार्यवाही

प्रपत्र ब

| अ.क्र. | स्वच्छता सुविधा | मागणी | प्रशासकीय मान्यता | तांत्रिक मान्यता | अकुशल मजूर | | | कुशल मजूर | | | *म.गा.रा.रो.ह. योजनेतंर्गत समाविष्ट करावयाच्या संभावित बाबी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | एकूण मनुष्य दिवस | दर (रु.) | प्रदान | एकूण मनुष्य दिवस | दर | प्रदान | | |
| १ | दैयक्तिक शौचालय | दैयक्तिक लाभार्थी | सं.स्व.अ.अंतर्गत प्राधिकृत अधिकारी | सं.स्व.अ.अंतर्गत प्राधिकृतअभियंता | ६ | १२७/- | हजेरीपत्रकाद्वारे (MusterRoll) | २ | जिल्हा दर सुचीनुसार | प्रमाणकाद्वारे( By Voucher) | वैयक्तिक शौचालयाचे जोत्यापर्यंतचे (Up to Plinth Level)बांधकाम शोष खड्यासह | |
| २ | अंगणवाडी स्वच्छतागृह | सरपंच | सं.स्व.अ.अंतर्गत प्राधिकृत अधिकारी | सं.स्व.अ.अंतर्गत प्राधिकृतअभियंता | १० | १२७/- | हजेरीपत्रकाद्वारे (MusterRoll) | ३ | जिल्हा दर सुचीनुसार | प्रमाणकाद्वारे( By Voucher) | खोदकाम,पायातील कॉक्रीट,विटांचे बांधकाम,कॉक्रीट स्लॅब,कॉक्रीटचे लादी काम (Flooring),मातीचा भराव | |
| ३ | शालेय स्वच्छतागृह | शाळा व्यवस्थापन समिती | सं.स्व.अ.अंतर्गत प्राधिकृत अधिकारी | सं.स्व.अ.अंतर्गत प्राधिकृतअभियंता | २५ | १२७/- | हजेरीपत्रकाद्वारे (MusterRoll) | ८ | जिल्हा दर सुचीनुसार | प्रमाणकाद्वारे( By Voucher) | खोदकाम,पायातील कॉक्रीट,विटांचे बांधकाम,कॉक्रीट स्लॅब,कॉक्रीटचे लादी काम (Flooring),मातीचा भराव | |
| ४ | सार्वजनिक स्वच्छतागृह (१० युनिट) | सरपंच | सं.स्व.अ.अंतर्गत प्राधिकृत अधिकारी | सं.स्व.अ.अंतर्गत प्राधिकृतअभियंता | २५० | १२७/- | हजेरीपत्रकाद्वारे (MusterRoll) | ८५ | जिल्हा दर सुचीनुसार | प्रमाणकाद्वारे( By Voucher) | खोदकाम,पायातील कॉक्रीट,दगडी बांधकाम,विटांचे बांधकाम,कॉक्रीट स्लॅब व बिम ,सिमेंट गिलावा (Plaster),मातीचा भराव | |

*टिप- स्वच्छता सुविधांसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत समाविष्ट करावयाच्या बाबी या मार्गदर्शक असून जिल्हानिहाय नमुना आराखडा (Type Plan) व अंदाजपत्रकानुसार प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात यावी.महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सुरुवातीचा बांधकामाचा भाग पूर्ण झाल्यानंतर आवश्यकतेनुसार संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत कुशल व अकुशल मजुर लावून काम पूर्ण करण्यात यावे. संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत हाती घेण्यात येणाऱ्या बाबींसाठी सदर योजनेचा दर लागू राहील.

५८